


## संविधान जागर अभियानातर्फे

**भगवान गौतम बुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधींना विनम्र अभिवादन आणि विजयादशमी, धम्मचक्रप्रवर्तन दिन व गांधी जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा**

**भगवान गौतम बुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी, या तीनही महामानवांना त्रिवार वंदन!**



2 ऑक्टोबर 2025 रोजी भारताच्या स्वातंत्र्य लढ्याचे नेते महात्मा गांधी यांची 156 वी जयंती आहे. याच दिवशी विजयादशमीही आहे. चांगल्याचा वाईटावर विजय साजरा केला जाणारा दिवस. 1956 साली याच दिवशी, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार करून बुद्धविचार पुन्हा या मातीत रुजवला, त्यामुळे 2 ऑक्टोबरला 79 वा धम्मचक्रप्रवर्तन दिनही आहे. अशा सुवर्ण योगायोगाचे औचित्य साधून, या तीन महामानवांच्या विचारांचा जागर करण्याचा हा एक छोटा प्रयत्न.



डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि बापूंनी अहिंसेच्या मार्गाने देशाला स्वतंत्र आणि स्वाभिमानी केले
**“भगवान बुद्धांनी हिंसेचा विरोध केला, पण अन्यायाचा प्रतिकार करायलाही शिकवले.”**
-- डॉ बाबासाहेब आंबेडकर, ‘बुद्ध आणि त्यांचा धम्म’

अहिंसक मार्गाने अन्यायाचा प्रतिकार करणे म्हणजे सत्याग्रह. (किंवा अन्यायाविरुद्ध शांततेने, आणि दृढ निश्चय याद्वारे प्रतिकार करण्याचा एक अभिनव अहिंसक मार्ग म्हणजे सत्याग्रह.) सत्याग्रहाचा मार्ग सामान्य माणसालाही अनुसरता येतो. पुरूष असो वा महिला, समुह असो वा एकटा, शरीराने बलवान असो वा दुर्बळ, तरुण असो वा वृद्ध—अगदी लहान मूलदेखील. हीच त्याची ताकद आहे. महात्मा गांधींनी सामान्य भारतीयांची ही ताकद जागी केली. करोडो लोक **‘सविनय कायदेभंग’**, **‘चले जाव’** सारख्या आंदोलनांमध्ये सामील झाले आणि ब्रिटिश राजवटीतून देश स्वतंत्र केला.



1927 साली महाडच्या चवदार तळे आंदोलनाच्या वेळेस बाबासाहेबांनी घोषणा केली की -
**“आम्ही चवदार तळ्याला फक्त पाणी पिण्यासाठी जात नाही आहोत. इतरांसारखी आम्हीही माणसं आहोत, हे ठामपणे सांगण्यासाठी जात आहोत. ”**



डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या सत्याग्रहातून देशातील करोडो दलित-वंचितांचा स्वाभिमान जागा केला. माणुसकीला कलंक असलेली अस्पृष्यता व जातीय भेदभाव नष्ट केल्याशिवाय स्वराज्याला काहीच अर्थ राहणार नाही याची जाणीव देशाला करून दिली. गांधीजींवरही या लढ्याचा प्रभाव पडला. 1942 मध्ये हरिजन पत्रात महात्मा गांधींनी घोषणा केली की - **“केवळ अस्पृष्यता नष्ट करणे पुरेसे नाही. जातीव्यवस्थाच नष्ट झाली पाहिजे. जेव्हा आंतरजातीय विवाह सामान्य होऊन जातील, तेव्हाच जातींचा अंत होईल.”**

1940 नंतर बापूंनी ही भूमिका घेतली की **“मी केवळ आंतरजातीय लग्नसोहळयात उपस्थित राहीन, जेथे वर किंवा वधू हरिजन असेल”**. बाबासाहेबांचा दुसरा विवाह हा आंतरजातीय होता. त्यावेळेस बाबासाहेबांनी असे म्हटले की – **“आज बापू असते तर नक्कीच या लग्नाला आले असते”**. तसेच, बाबासाहेबांना संविधान सभेत आणि पहिल्या कॅबिनेटमध्ये सामील करण्यात बापूंची महत्त्वाची भूमिका होती. या दोन महामानवांमध्ये मतभेद होते, पण त्यांनी मतभेदांना कधीही देशापेक्षा, जनतेपेक्षा मोठे मानले नाही.

## भारतामध्ये लोकशाही फुलवली

गौतमबुद्धांनी भिक्कुसंघाच्या माध्यमातून लोकशाहीचे बीज या मातीमध्ये रोवले, आणि आधुनिक भारतामध्ये बापू आणि बाबासाहेबांच्या कार्यातून त्याला मोठ्या वृक्षाचे रूप आले. महात्मा गांधी यांनी 1938 मध्ये लिहिले होते की हिंसेच्या प्रयोगातून हुकुमशाही उत्पन्न होते. लोकशाही अहिंसेच्या प्रयोगातूनच उत्पन्न होऊ शकते. तसेच बाबासाहेबांनीही लिहून ठेवलंय की **"लोकशाही फक्त शासन चालवण्याची पद्धत नाही. मुळात ती माणसामाणसातील आदराची आणि सन्मानाची एक भावना आहे."**



भारताचा स्वातंत्र्यलढा हा अहिंसक होता म्हणून देशाच्या जनतेमध्ये लोकशाहीचे मूल्य पसरले आणि खोलवर रुजले. बाबासाहेबांनी भारतीय संविधानाच्या रचनेत लोकशाहीला केंद्रस्थानी ठेवले. देशातील सर्व प्रौढांना मतदानाचा अधिकार दिला, आजही भारतात लोकशाही टिकून आहे ती संविधानामुळेच. नाहीतर, त्या काळात युरोपियन गुलामीतून स्वतंत्र झालेले अनेक देश नंतर हुकुमशाहीकडे वळले.

## स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेवर आधारित समाज

बाबासाहेब म्हणत की -- **"माझे सामाजिक तत्वज्ञान स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता यांमध्ये अंतर्भूत आहे. मी माझे तत्वज्ञान फ्रेंच क्रांतीकडून घेतले नाही. ते तत्वज्ञान मी माझे माझ्या गुरू बुद्धांच्या बुद्ध यांच्या शिकवणीतून घेतले आहे."** गांधीजींनीही असाच विचार व्यक्त केला. ते म्हणाले होते - **"मला दर्जाची समानता आणायची आहे. शतकांपासून कामगार वर्गाला बहिष्कृत करून खालच्या दर्जात टाकले गेले आहे. त्यांना शुद्र म्हटले गेले आहे. विणकराचा मुलगा, शेतकरी आणि शाळेचा शिक्षक यांच्यात कोणताही भेदभाव केलेला मला चालणार नाही."** स्वतंत्र भारतात समता स्थापित व्हावी हे गांधीजी आणि बाबासाहेब दोघांचेही स्वप्न होते. भारतीय संविधानामध्ये याच विचारांचे प्रतिबिंब आहे. भारतात सर्वांना दर्जाची आणि संधीची समानता मिळायला हवी हे तर संविधानाच्या उद्देशिकेमध्येच घोषित केले आहे. संविधानातील मार्गदर्शक तत्वे सांगतात की सर्वांना प्रगतीची संधी मिळेल आणि सर्वांचे राहणीमान उंचावेल असे धोरण रचणे लागू करणे आणि कठीण परिस्थितीमध्येही त्यानुसार देश चालवणे हे सरकारचे कर्तव्य आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळे आणि आग्रहामुळे हे तत्व संविधानामध्ये आले आहे.

## बंधुता हीच स्वातंत्र्य आणि समतेची हमी



गौतमबुद्धांप्रमाणे बाबासाहेबांनी आणि गांधीजींनीही बंधुतेला विशेष महत्त्व दिले. बाबासाहेब म्हणतात **"भगवान बुद्धांनी बंधुतेला सर्वोच्च दर्जा दिला - कारण समता आणि स्वातंत्र्याचे रक्षण केवळ बंधुताच करू शकते. बंधुता म्हणजेच माणुसकी, बंधुता म्हणजेच धर्म."** जनतेमध्ये जातीभेद मिटून बंधुभाव स्थापित व्हावा यासाठी बाबासाहेबांनी आपले आयुष्य पणाला लावले. आणि सांप्रदाईक द्वेषातून उफाळून आलेले दंगे थांबवून बंधुता स्थापित करण्यासाठी बापूंनी आपले प्राण गमावले.

बंधु-भगिनींनो, आपण आपल्या कृतीमधून भगवान बुद्धांना, डॉ बाबासाहेब आंबेडकरांना आणि महात्मा गांधींना अभिवादन करूया. समाजामध्ये प्रेम आणि बंधुभाव रुजवूया. स्वातंत्र्य, समता, लोकशाही, न्याय या भारतीय संविधानाच्या मूल्यांचा, म्हणजेच गांधीजी आणि बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार करूया!


## संविधान जागर अभियान

**संविधान जागर अभियान निमंत्रक समिती:** मा. न्या. बी. जी. कोळसे पाटील, मा. न्या. अभय ठिपसे, मा. न्या. तानाजी नलावडे, तुषार गांधी, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, धनाजी गुरव, नीरज जैन

**स्वप्निल फुसे: 79723 45764 | नागार्जुन वाडेकर: 98602 39899 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739** samvidhanjagar.org